1 7 MAR 2025 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जैन समाजाचे तत्त्व स्वीकारण्यावरच मानव समाजाचे भवितव्य अवलंबून

## राष्ट्रीय चर्चासत्रात कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांचे प्रतिपादन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

जैन धर्म हा शास्त्रीय व विश्वधर्म आहे. पर्यावरण संरक्षण, जगा व जगू द्या व अहिंसा या घटकावर आधारित आहे. मानव समाजाचे भवितव्य हे जैन तत्व स्वीकारण्यावर अवलंबून असणार आहे. अन्यथा फार मोठ्या पर्यावरणीय व अस्तित्वाच्या संघर्षाला तोंड द्यावे लागेल, असे मत शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी व्यक्त केले.



**कोल्हापूर : भगवान महावीर दर्शन, दिगंबर जैन बोर्डिंग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राष्ट्रीय चर्चासत्रात उद्घाटन प्रसंगी बोलताना शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे. समवेत डॉ. विजय ककडे, डॉ. सरिता ठकार, डॉक्टर बी. डी. खणे आदी. (छाया : नाज ट्रेनर)**

भगवान महावीर दर्शन आणि दिगंबर जैन बोर्डिंग यांच्या संयुक्त विद्यमाने आचार्य शांतिसागर व राष्ट्रसंत विद्यानंद महाराज शताब्दी निमित्त राष्ट्रीय चर्चासत्रात उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

कुलसचिव डॉ. शिंदे म्हणाले, जैन गणित व ज्योतिष शास्त्र यामध्ये शास्त्रीय अभ्यास अधिक प्रमाणात आहे. त्याचा फायदा सर्व मानव जातीला होईल. प्रथम सत्रामध्ये जैन गणित विषयावर अहिल्याबाई विश्वविद्यालय माजी कुलगुरू डॉ. रेणू जैन यांनी मार्गदर्शन केले. जैन गणित हे प्राचीन असून भारतीय समृद्ध परंपरा जोपासण्यासाठी आवश्यक आहे. २०५० पर्यंत प्रगत भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी हा महत्त्वाचा वारसा जोपासणे आवश्यक आहे.

डॉ. अनुपम जैन यांनी जैन गणित ही संकल्पना स्पष्ट केली. चर्चासत्राचे अध्यक्षस्थान शिवाजी विद्यापीठाच्या गणित विभागाच्या प्रमुख डॉ. सरिता ठकार होत्या.

दुसऱ्या चर्चासत्रात प्रथम आचार्य शांतिसागर महाराज यांच्यावर डॉ. नेमिनाथ शास्त्री बाहुबली राष्ट्रसंत विद्यानंद महाराज यांच्या विचाराचा ऐतिहासिक आढावा डॉ. बी. डी. खणे यांनी घेतला. तिसऱ्या चर्चासत्रात जैन ज्योतिष शास्त्र विषयावर डॉ. पंकज उपाध्ये यांनी जैन ज्योतिष शास्त्राची मांडणी केली. डॉ. विजय ककड यांनी प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. संदीप पाटील यांनी आभार मानले.

17 MAR 2025

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जैन धर्म हा शास्त्रीय, विश्वधर्म

## व्ही. एन. शिंदे : जैन गणित व ज्योतिषशास्त्र परिषद

लोकमत न्यूज नेटवर्क



भगवान महावीर दर्शन आणि दिगंबर जैन बोर्डिंग, कोल्हापूर यांच्या वतीने रविवारी कोल्हापुरात आयोजित केलेल्या जैन गणित व ज्योतिषशास्त्र राष्ट्रीय परिषदेत शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी संजय शेटे, डॉ. बी. डी. खाणे, प्रा. डी. ए. पाटील, डॉ. विजय ककडे आदी उपस्थित होते.

**कोल्हापूर :** जैन धर्म हा शास्त्रीय व विश्वधर्म असून, पर्यावरण संरक्षण, जगा व जगू द्या तसेच अहिंसा या महत्त्वाच्या आचरणात आणण्याच्या घटकावर आधारित आहे. जैन तत्त्व स्वीकारून वाटचाल केली नाहीतर फार मोठ्या पर्यावरणीय व अस्तित्वाच्या संघर्षाला तोंड द्यावे लागेल, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी केले.

भगवान महावीर दर्शन आणि दिगंबर जैन बोर्डिंग, कोल्हापूर यांच्या वतीने विद्यामणी आचार्य शांतीसागर व राष्ट्रसंत विद्यानंद महाराज शताब्दीनिमित्त आयोजित 'जैन गणित व ज्योतिषशास्त्र' राष्ट्रीय परिषदेत ते बोलत होते. शिवाजी विद्यापीठाच्या भगवान महावीर अध्यासनचे डॉ. विजय ककडे यांनी प्रास्ताविक केले. जैन गणित या विषयावर बोलताना इंदौरच्या अहिल्याबाई विश्वविद्यालयाच्या माजी कुलगुरू डॉ. रेणू जैन म्हणाल्या, जैन गणित हे प्राचीन असून भारतीय समृद्ध परंपरा जोपासण्यासाठी आवश्यक आहे. आपण २०५० पर्यंत प्रगत भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी हा महत्त्वाचा वारसा जोपासणे आवश्यक आहे.

डॉ. अनुपम जैन यांनी जैन गणित ही संकल्पना तसेच अनेक प्राचीन संकल्पना या जैन साहित्यातून उगम पावल्याचे सांगितले. जैन ज्योतिषशास्त्राबाबत डॉ. पंकज उपाध्ये यांनी मार्गदर्शन केले. डॉ. बी. डी. खाणे, कोल्हापूर चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष संजय शेटे, डॉ. सरिता ठकार, प्रा. डी. ए. पाटील आदी उपस्थित होते. डॉ. संदीप पाटील यांनी आभार मानले.

17 MAR 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ‘संगीत’ तलाव आंतरराष्ट्रीय विज्ञानपत्रिकेच्या मुखपृष्ठावर

## झाडाच्या प्रतिबिंबात रासायनिक संयुगाच्या संरचनेचा आभास

कोल्हापूर, ता. १६ : एरव्ही विद्यार्थ्यांमध्ये ‘सनसेट पॉईंट’ म्हणून प्रसिद्ध असलेल्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाशेजारील तलावामधील झाडाच्या प्रतिबिंबामध्ये शिवाजी विद्यापीठातील शिक्षक, संशोधक डॉ. सुशीलकुमार जाधव यांना एका रासायनिक संयुगाच्या संरचनेचा आभास झाला. ते छायाचित्र त्याच ठिकाणाहून त्यांनी टिपले आणि ‘स्प्रिंजर नेचर’ प्रकाशनाच्या ‘मॅक्रोमॉलेक्युलर रिसर्च’ (मार्च २०२५) या आंतरराष्ट्रीय संशोधन पत्रिकेच्या मुखपृष्ठावर झळकण्याचा मान या छायाचित्राला लाभला.


याबाबत डॉ. जाधव यांनी सांगितले, ‘माझ्या मार्गदर्शनाखाली शंभूराज कापसे, प्रणोती पाटील संशोधन करीत आहेत. त्यांच्याच शोधनिबंधाच्या



डॉ. जाधव

विषयास अनुसरून हे मुखपृष्ठ तयार केले आहे. छायाचित्रातील झाडाच्या फांद्या आणि त्यांचे पाण्यातील प्रतिबिंब हे ब्रँच्ड-पॉलिथिलिनमाईन या बहुलकाप्रमाणे (पॉलिमर) दिसते. हा पॉलिमर पाणी शुद्धीकरणासाठी वापरण्यात येतो. या पॉलिमरद्वारे पाण्यातील सेंद्रिय, तसेच असेंद्रिय विषारी घटक वेगळे केले जाऊ शकतात. या छायाचित्राचा वापर शोधनिबंधातील वैज्ञानिक माहिती कलात्मक पद्धतीने दर्शवण्यासाठी करण्यात आला आहे.

डॉ. जाधव आणि संशोधक विद्यार्थ्यांचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी अभिनंदन केले.




**कोल्हापूर** : आंतरराष्ट्रीय विज्ञान पत्रिकेच्या मुखपृष्ठावर शिवाजी विद्यापीठातील संगीत तलावाचे छायाचित्र झळकले आहे.

17 MAR 2025
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# ऊर्जेच्या स्वयंपूर्णतेकडे विद्यापीठाची वाटचाल

बिग स्टोरी

संतोष मिठारी

## वीज बिलात दरमहा सात लाखांची बचत: पर्यावरणपूरक पाऊल



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या मुख्य इमारतीच्या छतावर सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यात आला आहे.

**पाण्याबाबत स्वयंपूर्ण झाल्यानंतर आता शिवाजी विद्यापीठाने ऊर्जेबाबत स्वयंपूर्ण, आत्मनिर्भर होण्याकडे वाटचाल सुरू केली आहे. त्यासाठी पर्यावरणपूरक सौरऊर्जेच्या वापराचे पाऊल टाकले आहे. सध्या ६८० किलोवॉट क्षमतेच्या प्रकल्पातून सौरऊर्जेची निर्मिती आणि वापर सुरू असून, त्याने दरमहा विद्यापीठाच्या वीज बिलात सात लाख रुपयांची बचत झाली आहे. पुढील काही वर्षांत संपूर्ण कॅम्पसचा वीज वापर सौरऊर्जेवर आधारित करण्याचा विद्यापीठाने संकल्प केला आहे.**



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या क्रांतिवनातील पथदिवे सौरऊर्जेने उजळले आहेत.



### कॅम्पसमध्ये ६८० किलोवॉटचे प्रकल्प कार्यान्वित

भविष्यात पाणी, ऊर्जेचा प्रश्न गंभीर बनणार असल्याचे लक्षात घेऊन विद्यापीठाने पहिल्यांदा पाण्याबाबत स्वयंपूर्णतेचे पाऊल टाकले. त्यानंतर गेल्या सात वर्षांपूर्वी पर्यावरणपूरक सौरऊर्जेच्या उपलब्धतेसाठी 'रुसा' अंतर्गत मिळालेल्या अनुदानातून विद्यापीठाची मुख्य इमारत, रसायनशास्त्र अधिविभागाच्या छतावर १८० किलोवॉटचा प्रकल्प उभारण्यात आला. त्यानंतर स्वनिधीतून विद्यापीठाने ५०० किलोवॉटचा प्रकल्प परीक्षा भवन, नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी आणि तंत्रज्ञान अधिविभागाच्या इमारतींच्या छतावर जानेवारी २०२५ पासून कार्यान्वित केला आहे. आता पुढील सहा महिन्यांत आणखी ३०० किलोवॉट क्षमतेचा प्रकल्प वि. स. खांडेकर भाषाभवन, अप्लाईड सायन्स विभागांमध्ये उभारला जाणार आहे.

### सौरऊर्जेचा असा होतोय वापर...

या प्रकल्पातून तयार होणाऱ्या सौरऊर्जेचा वापर प्रशासनाकडून कॅम्पसवरील क्रांतिवन आणि गेट क्रमांक आठ ते पाणी शुद्धीकरण प्रकल्प, एसएसबी बोर्ड ते राजेंद्रनगर चौक मार्गावरील सुतार विहीर या परिसरातील एकूण साठ पथदिवे उजळले आहेत. त्यासाठी काही बँकांनी त्यांच्या सीएसआर फंडातून मदतीचा हात दिला आहे. 'रुसा'च्या निधीतून तयार केलेल्या शंभर फुटी विहिरीवर सोलरपंप बसविण्यात आला आहे. मुख्य इमारत, रसायनशास्त्र अधिविभागात सौरऊर्जेचा वापर होत आहे. मुला-मुलींचे वसतिगृह, विद्यार्थी भवन, गेस्ट हाऊस, व्हीव्हीआयपी गेस्ट हाऊस, पाच बंगला, तंत्रज्ञान अधिविभागातील मुला-मुलींचे वसतिगृहातील एकूण ५५ हजार २५० लिटर पाणी सौरऊर्जेच्या माध्यमातून गरम केले जाते.

### 'एसी'ची हाव अन् खर्चात वाढ

विद्यापीठाचा कॅम्पस शहराला शुद्ध हवेचा पुरवठा करणारा महत्त्वाचा स्रोत आहे. मात्र, गेल्या पाच ते सात वर्षांपासून विद्यापीठातील विविध अधिविभागांमध्ये 'एसी' लावण्याची हाव वाढली आहे. त्याबाबत एकप्रकारे सपाटाच सुरू आहे. एखादा संशोधन प्रकल्प मंजूर झाल्यानंतर त्यात उपकरणे खरेदीसाठी निधी मिळतो. या उपकरणांसाठी 'एसी'ची गरज असल्याचे सांगून आणि अनेकदा त्याची आवश्यकता नसतानाही 'एसी' लावले जात आहेत. सध्या 'कॅम्पस'वर विविध इमारतींमध्ये दोनशे 'एसी' कार्यान्वित आहेत. पर्यावरणपूरक वातावरण, शुद्ध हवा असताना 'एसी'ची हाव थांबत नसल्याने वीज बिलाचा खर्च वाढत आहे. त्याचा प्रशासनाने गांभीर्याने विचार करणे महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

### नॅनो संमिश्रापासून सौरऊर्जा उपकरण निर्मिती

अतिसूक्ष्म अशा नॅनो-संमिश्रांपासून सौरऊर्जा निर्माण करणाऱ्या अभिनव स्वरूपाच्या बाईंडरविरहित उपकरण तयार करण्याची पद्धती विद्यापीठाच्या रसायनशास्त्र अधिविभागातील डॉ. क्रांतिवीर मोरे, सागर डेळेकर यांनी विकसित केली आहे. त्याला यू. के. सरकारचे पेटंट मिळाले आहे. कॅडमियम सल्फाइड क्वांटम डॉट, सेंद्रिय रंग, टायटॅनियम डायऑक्साइड या नॅनो मूलद्रव्यांचा वापर हे उपकरण बनवण्यासाठी केला. या उपकरण निर्मितीच्या नव्या पद्धतीमुळे सौर ऊर्जा क्षेत्रातील संशोधनाला नवी दिशा मिळणार आहे. हे उपकरण कमीत कमी तापमानामध्ये अत्यल्प वेळेत बनवता येते.

> विद्यापीठाची विजेची मागणी जास्तीतजास्त प्रमाणात सौरऊर्जेच्या माध्यमातून पूर्ण कशी होईल, यादृष्टीने नियोजन केले आहे. त्यातील पहिल्या आणि दुसऱ्या टप्प्यातील प्रकल्प कार्यान्वित असून, तिसऱ्या टप्प्यातील तीनशे किलोवॉट क्षमतेचा प्रकल्प लवकर सुरू केला जाईल. सौरऊर्जेच्या वापराने वीज बिलातील आर्थिक खर्चात बचत होत आहे.
> - डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू

### शून्य वीज बिलाचे ध्येय

विद्यापीठाला सध्या दीड ते दोन मेगावॉट वीज लागते. विद्यापीठाचा विकास आणि नव्या इमारतींची होत असलेली उभारणी याचा विचार करता विजेची गरज आणखी वाढणार आहे. ते लक्षात घेऊन विद्यापीठाने सौरऊर्जेच्या स्वयंपूर्णतेच्या दिशेने वाटचाल सुरू केली आहे. विद्यापीठाला सध्या २५ लाख रुपये वीज बिल येत होते. मात्र, सौरऊर्जेचा वापर सुरू झाल्याने गेल्या दोन महिन्यांपासून वीज बिल १८ लाख रुपयांवर आले आहे. भविष्यात हे बिल शून्य करण्याच्या ध्येय ठेवून विद्यापीठाचे काम सुरू असल्याचे कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी सांगितले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
17 MAR 2025

लोकमत




शिवस्पंदन क्रीडा महोत्सवाच्या सर्वसाधारण विजेतेपदाचा चषक कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते तंत्रज्ञान अधिविभागाच्या संघाला प्रदान करण्यात आला.

# विद्यापीठ कॅम्पसमधून उत्तमोत्तम आंतरराष्ट्रीय क्रीडापटू घडावेत

## डॉ. डी. टी. शिर्के : शिवस्पंदन महोत्सवात तंत्रज्ञान अधिविभागास विजेतेपद

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या कॅम्पसमधूनही उत्तमोत्तम, आंतरराष्ट्रीय कीर्तीचे क्रीडापटू घडावेत, या भूमिकेतून शिवस्पंदन क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यास सुरुवात केली. विद्यार्थ्यांनी विद्यापीठात उपलब्ध सुविधांचा वर्षभर लाभ घेऊन आपली कामगिरी उंचावत राहावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के यांनी केले.

शिवस्पंदन क्रीडा महोत्सवाच्या सर्वसाधारण विजेत्यांची घोषणा आणि पुरस्कार प्रदान सोहळा क्रीडा अधिविभागाच्या सभागृहात झाला. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील आणि कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. तंत्रज्ञान अधिविभागाने स्पर्धेमध्ये सर्वसाधारण विजेतेपद पटकावले.

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, क्रीडा स्पर्धांत गतवर्षी ७०० विद्यार्थी सहभागी झाले होते. यंदा हाच आकडा २५०० च्या घरात गेला. पुढील वर्षी तो आणखी वाढावा. यावेळी डॉ. शरद बनसोडे, डॉ. एन. डी. पाटील, प्रा. किरण पाटील, मानव्यशास्त्र विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, डॉ. रामचंद्र पवार उपस्थित होते.

**२५००**

यावेळी कुलगुरू डॉ. शिर्के यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते पुरस्कारांचे वितरण केले. क्रीडा अधिविभागाच्या संघाने सर्वसाधारण द्वितीय, तर गणित अधिविभागाने तृतीय क्रमांकाचे विजेतेपद पटकावले.

17 MAR 2025
पुण्यनगरी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात घुमणार शड्डू

## कुस्ती संकुलात प्रशिक्षणास लवकरच होणार सुरुवात

कोल्हापूर : वैभव गोंधळी

शिवाजी विद्यापीठातर्फे अद्ययावत असे कुस्ती संकुल उभारण्यात आले आहे. या कुस्ती संकुलामध्ये प्रशिक्षक नेमण्याची प्रक्रिया अंतिम टप्प्यामध्ये आहे. केवळ विद्यापीठामधील विद्यार्थ्यांनाच नव्हे, तर अन्य महाविद्यालये आणि शालेय विद्यार्थ्यांनाही येथे कुस्तीचे शास्त्रोक्त प्रशिक्षण दिले जाईल. त्यामुळे शिवाजी विद्यापीठात आता पैलवानांच्या शड्डूचा आवाज घुमणार आहे.

कोल्हापूर ही कुस्ती पंढरी म्हणून जगविख्यात आहे. राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी मल्लविद्येला राजश्रय दिला. त्याच राजर्षी शाहू महाराज यांच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी जयंतीचे औचित्य साधून दि. २६ जून, २०२४ रोजी रोजी शिवाजी विद्यापीठात कुस्ती संकुलाचे उद्घाटन करण्यात आले. विद्यापीठाच्या क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर क्रीडा संकुल परिसरात ते उभारण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना कुस्तीचे योग्य प्रशिक्षण मिळण्यासाठी नामवंत अशा प्रशिक्षकाची गरज होती. त्यासाठी विद्यापीठाकडून प्रक्रिया राबवण्यात आली आहे. लवकरच या प्रशिक्षकाची नेमणूक होऊन प्रत्यक्षात कुस्तीच्या प्रशिक्षणास सुरुवात करण्यात येणार आहे. त्याचबरोबर कुस्ती संकुलामधील उर्वरित कामांसाठी निधीची तरतूद केली आहे. त्यामुळे किरकोळ कामेही पूर्ण केली जाणार आहेत. त्यामुळे विद्यापीठात मल्लविद्येला प्रोत्साहन मिळेल.



### असे आहे कुस्ती संकुल

शिवाजी विद्यापीठाच्या क्रीडामहर्षी मेघनाथ नागेशकर क्रीडा संकुलाच्या परिसरात हे कुस्ती संकुल साकारले आहे. त्याचे क्षेत्रफळ ९५०० चौरस फूट आहे. त्यावर १ कोटी ६७ लाख ४७ हजार ९६५ रुपये इतका खर्च केला आहे. कुस्ती संकुलामध्ये सरावासाठी २ मॅट उपलब्ध असतील. तसेच व्यायामाशाळेची सोय उपलब्ध करून दिली आहे. खेळाडूंना स्पोर्ट हॉस्टेलमध्ये राहण्याची सोय असणार आहे.

### अंदाजपत्रकात खेळांना बळ

शनिवारी सादर करण्यात आलेल्या अंदाजपत्रकामध्ये खेळांसाठी चांगल्या तरतुदी केल्या आहेत. यामध्ये खेळाचे साहित्य खरेदी करण्यासाठी २५ लाख रुपयांची तरतूद केली आहे. विद्यापीठातील खेळांची मैदाने सुस्थितीत राहण्यासाठी घसारा निधीतून ३७ लाख रुपये, आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी १० लाख रुपयांची तरतूद केली आहे, तर विद्यापीठाच्या क्रीडा वसतिगृहासाठी ३ कोटी रुपयांची तरतूद केली आहे. पहिल्या टप्प्यातील त्याचे काम प्रगतिपथावर आहे. तसेच कुस्ती संकुलसाठी २०२३-२४ व २०२४-२५ मध्ये १ कोटी २० लाख रुपयांची तरतूद करण्यात आली होती. त्यानुसार काम पूर्ण झाले असून, स्वच्छतागृहासाठी २५ लाख तरतूद केली आहे.

17 MAR 2025
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिवाजी विद्यापीठात खेलो इंडिया कुस्ती प्रशिक्षण केंद्रासाठी प्रयत्न

## प्रस्ताव तयार करण्याचे नियोजन; खेळाडूंना होणार फायदा

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठात खेलो इंडियाचे कुस्ती केंद्र सुरू करण्यासाठीचे प्रयत्न सुरू झाले आहेत. यासंदर्भातील प्रस्ताव तयार करण्याचे नियोजन सुरू झाले आहे. यामुळे विद्यापीठ कार्यक्षेत्रातील खेळाडूंना मोठा फायदा होणार आहे.



विद्यापीठ परीक्षेत्रातील विद्यार्थ्यांना उच्चतम कुस्ती प्रशिक्षण सुविधा मिळाव्यात, यासाठी विद्यापीठ विविध उपक्रम राबवत आहे. त्याचाच एक भाग म्हणून छत्रपती शाहू महाराज यांच्या १०० व्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त कुस्ती हॉलची उभारणी करण्यात आली आहे. त्याचा उपयोग कुस्तीगीरांना व्हावा व चांगले खेळाडू तयार व्हावेत, यासाठी येणाऱ्या कालावधीत केंद्र सरकारचे खेलो इंडिया कुस्ती केंद्र सुरू करण्यात येणार आहे.

खेलो इंडियाअंतर्गत कुस्ती केंद्र सुरू झाल्यानंतर दरवर्षी पाच लाख रुपये अनुदान मिळणार आहे. त्याचबरोबर खेळाडूंची जेवण, डायट, सराव आदी गोष्टींचा खर्च शासनाकडून केला जाणार आहे. कुस्ती केंद्रात ३० खेळाडूंना सराव करता येणार आहे. त्यासाठी आवश्यक असणारे वसतिगृहाचे काम गतीने सुरू आहे. त्यामध्ये १५० खेळाडू राहतील अशी व्यवस्था असणार आहे.

राष्ट्रीय खेलो इंडिया कुस्ती केंद्राला लागणारे कुस्ती हॉल, जीम, हॉस्टेल, फिटनेस ट्रेनिंगसाठी सिंथेटिक ट्रॅक, हिल ट्रेनिंगसाठी हिल ट्रेनिंग ट्रॅक, तसेच इतर लागणारे सर्व सोयीसुविधा विद्यापीठांमध्ये उपलब्ध आहेत.

कुस्ती केंद्र झाल्यानंतर राज्य, राष्ट्रीय पातळीवरील उच्च दर्जाचे प्रशिक्षण देणारे प्रशिक्षक यामुळे उपलब्ध होतील. कोल्हापूरमध्ये राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय खेळाडू घडविण्यास मदत होईल. उच्चस्तरीय व अद्ययावत प्रशिक्षण राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्पर्धेमध्ये सहभागाची संधी मिळेल. वेगवेगळ्या राष्ट्रीयस्तरीय प्रशिक्षण शिबिरामध्ये प्रशिक्षण घ्यायची संधी केंद्रामार्फत खेळाडूंना मिळणार आहे.

